Website: www.word-pdf-convert.com

# के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय

अ.प्र.क्र. आरटीएस-५९/शेलगांव देशमुख/०९ /२००९-१०

श्री. मंगल उध्दवराव जोशी ,
रा. शेलगांव देशमुख ह.मु. तोरणागड नगर
१३ व्ही योजना आर-२२/५ धुत दवाखान्या
समोर औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद - - अपिलार्थी

विरुध्द

श्री मुरलीधर उध्दवराव जोशी - - प्रतिवादी
रा. शेलगांव देशमुख ता. मेहकर
जि. बुलडाणा

## आदेश

( पारित दिनांक ३१ ऑगस्ट , २०१० )

मौजे शेलगांव देशमुख ता.मेहकर जि.बुलडाणा येथील गट नं. ५३७ मधील १.६० हे.आर. जमीनी संदर्भात घेतलेला फेरफार क्र. ४३६ हा उप विभागीय अधिकारी मेहकर यांनी रा.अ.प्र. आरटीएस-५९ /शेलगांव देशमुख /४८/२००८-०९मधील दिनांक २९.८.२००९ चे आदेशन्वये रद्द ठरविलेला आहे. सदर आदेशाने व्यथीत होऊन अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील दाखल केले आहे.त्याच प्रमाणे सदर आदेशा स्थगिती मिळणे स्वतंत्र अर्ज दाखल केलेला आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात येऊन प्रतिवादीस नोटिस देण्यात आली आहे.

स्थगनादेश अर्जाचे अनुषंगाने प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकन करुन दिनांक ५.१.२०१० पावेतो प्रकरणात जैसे थे आदेश देण्यात आलेला आहे.

अपीलार्थी यांचे वतीने त्यांचे वकिलांनी लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे. की, वादातील फेरफारा मधील जमीन वंशपरंपरागत आहे. श्रीमती पार्वताबाई उध्दवराव जोशी यांचे निधन झाल्याने वारस पंजी क्रमांक ७६ नुसार नोंदी झाल्या आहेत. अपीलार्थी व प्रतिवादी यांच्या चार बहिणीनी हक्क सोडल्याचा लेख दिलेला आहे. अपीलार्थी व प्रतिवादी यांचे मध्ये वाटणीपत्र झाले. त्या नुसार फेरफार क्र. ४३६ दिनांक २७.१२.२००४ रोजी रुजु झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कुठलीही हरकत घेण्याचा अधिकार नाही. त्या संबधाने निर्णय घेण्याचा अधिकार हा महसुल अधिकारी यांना नसुन मा.दिवाणी न्यायालयात हरकत अर्जदाराने दाद मागावी त्यामुळे अपील मंजुर करुन न्याय देण्यात यावा.

प्रतिवादी यांनी त्यांचे वकिलामार्फत प्रकरणात लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की, मयत आई पार्वताबाई हिच्या मृत्युपश्यात वादातील जमीन प्रतिवादीच्या कोऱ्या स्टॅम्पचा गैर वापर करुन अपीलार्थीनी जमीन स्वता:चे नावे करुन घेतली. तलाठयाशी हात मिळवणी करुन अपीलार्थी एकमेव वारस नसतांना प्रतिवादी यांना कलम ९ व १२ नुसार नोटीस न देता चुपचाप फेरफार केला आहे. दिनांक २०.१०.२००७ च्या तथाकथीत वाटणी पत्रामध्ये अपीलार्थीस पुर्ण ४ एकर जमीन दिली आहे. प्रतिवादीला १ गुंठाही जमीन मिळाली नाही. त्यामुळे अपीलार्थीनी बोगस वाटणी पत्र तयार केले असल्याने ते ग्राहय धरता येणार नाही. आईच्या मृत्यु पुर्वीच म्हणजे सन २००३ पुर्वी १९९२ मध्ये बहिणीचा हक्क सोडल्याचा लेख दिला आहे. तसेच वादातील फेरफारा मध्ये हक्क सोडल्याच्या लेखाचा उल्लेख करणे बेकायदेशीर आहे. उप विभागीय अधिकारी मेहकर यांनी योग्य प्रकारे कारण मिमांसा देऊन कायदेशीर आदेश पारित केला आहे. त्यामुळे सदर आदेश कायम करण्यात यावा व अपीलार्थीचे अपील खारीज व्हावे.

Website: www.word-pdf-convert.com

उभय पक्षांचा लेखी युक्तीवाद, कनिष्ठ कोर्टाचे प्रकरण व त्यात पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन व निरिक्षण केले. फेरफार क्र. ४३६ चे अवलोकन केले असता सदरहु फेरफार नायब तहसिलदार मेहकर यांनी मंजुर केला आहे. त्यानुसार देणार घेणार हजर , आपसात वाटण्या मंजुर असल्याने नोंद मंजुर असा शेरा आहे. कनिष्ठ कोर्टातील प्रकरणा मधील तलाठी शेलगाव देशमुख हयांचे दिनांक ९.६.२००९ चे प्रतिवेदन पृष्ठ क्र. ३५ वर ठेवले आहे. त्यात तलाठी यांनी प्रामुख्याने नमुद केले आहे की, वाटणीपत्रका स्टॅम्प स्वत: प्रतिवादी यांनी आणुन दिलेला आहे. नऊ व बाराच्या नोटीस काढुन प्राप्त झाल्याबाबतच्या सहया घेतल्या. आज रोजी नोटीसा रेकॉर्डला सापडल्या नाहीत. वाटणी पत्राबाबत किंवा हक्क सोडल्याच्या लेखा बाबत कोणाचाही हरकत अर्ज आजपर्यंत प्राप्त झालेला नाही. फेरफार मंजुर करतांना उभय पक्ष देणार घेणार हजर होते. तसेच तलाठयाच्या प्रतिवेदना नुसार कुठल्याच प्रकारची हरकत अजपर्यंत प्राप्त झाली नसल्याचे नमुद असल्याने सदर फेरफार संपुर्ण प्रक्रिया नियमानुसार पुर्ण करुनच घेतला असल्याची माझी खात्री झाल्याने प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

अपिलार्थीचे अपील मंजूर करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी, मेहकर यांनी प्र.अ.क्र. आरटीएस-५९/शेलगांव देशमुख /४८/२००८-०९ मध्ये पारीत केलेला आदेश दिनांक २९.८.२००९ रद्द ठरविण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

अपर जिल्हाधिकारी यांचे न्यायालय सत्यमेव जयते बुलडाणा

(के.एम.कामुने)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

**प्रतिलिपी**

उप विभागीय अधिकारी, मेहकर यांना त्यांच्या फाईलवरील रा.अ.प्र..क्र. आरटीएस-५९/शेलगांव देशमुख /४८/२००८-०९ सह अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा